**<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक ३९/२०२६.</u>**
**<u>शोभा गडेकर व ईतर वि. निरंक</u>**
**<u>CNR No : MHBI130001512026.</u>**

**<u>:: निशाणी क्रमांक ०१ वरील आदेश ::</u>**

प्रस्तुतचा अर्ज हा बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत दाखल केला आहे.

**०२.** अर्जदार क्र. १ चे पती आणि अर्जदार क्र. २ व ३ यांचे वडील नामे **शिवाजी पि. नरसिंग गडेकर** हे दिनांक ११/०६/२०२५ रोजी परळी वै., जि. बीड येथे मयत झाले आहेत. मयत **शिवाजी पि. नरसिंग गडेकर** यांची आई नामे कलावंती भ्र. नरसिंग गडेकर या सुध्दा ब-याच वर्षापूर्वी मयत झालेल्या आहेत. मयत **शिवाजी पि. नरसिंग गडेकर** यांना अर्जदारांशिवाय ईतर कोणीही वारस नाही. अर्जदारांना विविध शासकीय व निमशासकीय कार्यालयात दाखल करण्यासाठी कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

**०३.** प्रकरणात आदेश पारीत करून दिनांक २९/०१/२०२६ रोजीचे दैनिक **"वैद्यनाथ वार्ता"** या वर्तमानपत्रात सदर प्रकरणाबाबत जनतेस जाहीर नोटीस बजाविण्यात आले. त्या वर्तमानपत्राची आवृत्ती नि. १३ वर अभिलेखावर दाखल आहे.

**०४.** अर्जदार क्र. ०२ राहूल पि. शिवाजी गडेकर यांनी त्यांचा पुरावा निशाणी क्र. १४ प्रमाणे अभिलेखावर दाखल केला आहे. अर्जदारांची पुरावा संपल्याची पुरसीस निशाणी क्र. १५ वर आहे. अर्जदार हेच मयत **शिवाजी पि. नरसिंग गडेकर** यांचे कायदेशिर वारस आहेत. अर्जदारांनी मृतक **शिवाजी पि. नरसिंग गडेकर** यांचे मृत्यु प्रमाणपत्र नि.क्र. ०५ वर, वारसाचे प्रमाणपत्र नि.क्र. ०६ वर व अर्जदार यांचे आधार कार्ड च्या प्रती अभिलेखावर दाखल केल्या आहेत.

०५.        जनतेस जाहीर नोटीस देवुन सुध्दा आजपावेतो वारसप्रमाणपत्र देण्याबाबत कोणतेच आक्षेप न्यायालयास प्राप्त झाले नाही. म्हणुन अभिलेखावरील तोंडी व कागदोपत्री पुराव्यावरून अर्जदार हेच मृतकाचे वारस असल्याचे दिसुन येते. म्हणुन खालील आदेश पारीत.

**:: आदेश ::**

०१. अर्ज मंजुर.

०२. न्यायालयीन शुल्क भरल्यानंतर बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ मधील अपेन्डीक्स-बी प्रमाणे **अर्जदार क्र. ०१. शोभा भ्र. शिवाजी गडेकर, ०२. राहूल पि. शिवाजी गडेकर आणि ०३. वैष्णवी पि. शिवाजी गडेकर** यांना मयत **शिवाजी पि. नरसिंग गडेकर** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र निर्गमित करण्यात यावे.

०३. बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम ८ अन्वये दिल्या जाणा-या प्रमाणपत्रासोबत दिवाणी नियमावली परिच्छेद ३१२ मध्ये दिलेल्या सुचना जोडाव्यात.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by DIPAK RUSTUMRAO BORDE
Date: 2026.03.23 16:20:23 +0530

दिनांक – २३/०३/२०२६.
ठिकाण - परळी वैजनाथ.

**( दिपक रु. बोर्डे )**
दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर)
परळी वैजनाथ

---

:: **Certificate of Stenographer** ::

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Order"

Dictated On : 23/03/2026.
Transcribed On : 23/03/2026.
Checked & Signed On : 23/03/2026.
Date : 23/03/2026.
Place : Parli Vaijnath.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by GUPTA SACHIN SATISH
Date: 2026.03.23 16:21:16 +0530

**( Sachin S. Gupta )**
Stenographer (Grade – 3)
Civil Court (Junior Division) & J.M.F.C.
Parli Vaijnath (MHBI-13)